क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १९/०८/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२०/२०२४/ कोषा. प्रशा.-५, दिनांक १६ ऑगस्ट, २०२४.

**विषय :-** अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई, जिल्हा कोषागार कार्यालये आणि उप कोषागार कार्यालये यांचेमार्फत होणारी सर्व प्रदाने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ई-कुबेर (e-Kuber) मार्फत अदात्यांच्या बँक खात्यांत थेट जमा करणेबाबत...

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२४ / प्र.क्र.२०/ २०२४ / कोषा. प्रशा.-५, दिनांक १६ ऑगस्ट, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०८१६१२४५२५६३०५ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके /आस्थापना /प्रशासन नियोजन व समन्वय /विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /आर्थिक गुन्हे /दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था/आस्थापना/प्रशासन/सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/ महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग / नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई. नक्षल विरोधी अभियान,नागपूर.



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह )
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./ प्रशासन / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/ उपसहायक
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.०१ ते ४४

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके " लेखा " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई; जिल्हा कोषागार कार्यालये आणि उप कोषागार कार्यालये यांचेमार्फत होणारी सर्व प्रदाने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ई-कुबेर (e-Kuber) मार्फत अदात्यांच्या बँक खात्यांत थेट जमा करणेबाबत......

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०२४/प्र.क्र.२०/२०२४/कोषा. प्रशा.- ५**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख : १६ ऑगस्ट,२०२४.

**वाचा**:- १. वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-१०१०/प्र.क्र.६८/ कोषा. प्रशा.- ५, दि.२३.१२.२०१०.
२. वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-१०१०/प्र.क्र.६८/ कोषा. प्रशा.- ५, दि.२२.०१.२०१३.
३. वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२०/प्र.क्र.६/ कोषा. प्रशा.- ५, दि.११.०३.२०२०.
४. वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२०/प्र.क्र.६/ कोषा. प्रशा.- ५, दि.१२.११.२०२१.

## प्रस्तावना :

(अ) उपरोक्त 'वाचा' मधील अनुक्रमांक १ येथे नमूद शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या मान्यतेस अनुसरून आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई किंवा जिल्हा कोषागार कार्यालये येथे सादर केलेल्या सर्व देयकांचे प्रदान ECS (ईसीएस) व NEFT (एनईएफटी) या आधुनिक सुविधांचा वापर करुन भारतीय रिझर्व्ह बँकेच्या / सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या सहाय्याने करण्याची कार्यवाही करण्यात येत होती.

(आ) तद्नंतर उपरोक्त 'वाचा' मधील अनुक्रमांक २ येथे नमूद शासन निर्णयान्वये अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई; जिल्हा कोषागार कार्यालय, नागपूर, मराठवाडयातील काही जिल्हा कोषागार कार्यालये आणि राज्यातील काही उप कोषागार कार्यालये वगळता, राज्यातील अन्य सर्व जिल्हा कोषागार कार्यालये आणि उप कोषागार कार्यालये यांच्यामार्फत होणारी सर्व प्रदाने आहरण व संवितरण अधिकारी, पुरवठादार, कंत्राटदार व अनुदान प्राप्त संस्था यांच्या खात्यात थेट भारतीय स्टेट बँक यांनी पुरविलेल्या Cash Management Project (CMP) या सुविधेद्वारे करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

(इ) दरम्यानच्या काळात राज्य शासनाची संगणकीय प्रणाली भारतीय रिझर्व्ह बँकेच्या 'ई-कुबेर' सोबत संलग्न (Integration) करण्याबाबत भारतीय रिझर्व्ह बँक आणि महालेखापाल कार्यालय सातत्त्याने आग्रही होते. या पार्श्वभूमीवर उपरोक्त 'वाचा' मधील अनुक्रमांक ३ आणि ४ येथे नमूद शासन निर्णयान्वये अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई तसेच जिल्हा कोषागार कार्यालय, नागपूर यांच्यामार्फत होणारी सर्व प्रदाने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या 'ई-कुबेर' मार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(ई) तद्नंतर फेब्रुवारी २०२२ ते नोव्हेंबर २०२२ दरम्यान विविध ३० उप कोषागार कार्यालये आणि जिल्हा कोषागार कार्यालय सातारा व जिल्हा कोषागार कार्यालय अकोला ही दोन जिल्हा कोषागार कार्यालये यांच्यामार्फत होणारी सर्व प्रदाने प्रायोगिक तत्वावर भारतीय रिझर्व्ह बँकेच्या 'ई-कुबेर' मार्फत अदात्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

या पार्श्वभूमीवर राज्यातील उर्वरित सर्व जिल्हा कोषागार कार्यालये आणि उप कोषागार कार्यालये यांच्या मार्फत होणारी सर्व प्रदाने देखील भारतीय रिझर्व्ह बँकेच्या 'ई-कुबेर' मार्फत अदात्यांच्या बँक खात्यांत थेट जमा करण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णयः-**

(१) या शासन निर्णयान्वये उपरोक्त 'वाचा' मधील अनुक्रमांक १, ३ व ४ येथे नमूद शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत.

(२) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई; सर्व जिल्हा कोषागार कार्यालये आणि सर्व उप कोषागार कार्यालये यांच्या मार्फत होणाऱ्या सर्व शासकीय प्रदानांसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने विकसित केलेली 'ई-कुबेर' ही प्रदान पध्दती दिनांक ०१.१०.२०२४ पासून पूर्ण क्षमतेने अंमलात येईल.

(३) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई; सर्व जिल्हा कोषागार कार्यालये आणि सर्व उप कोषागार कार्यालये यांच्या मार्फत होणाऱ्या सर्व शासकीय प्रदानांसाठी 'ई-कुबेर' ही एकमेव प्रदान पध्दती अंमलात येणार असल्याने दिनांक ०१.१०.२०२४ पासून प्रदानाचे इतर पर्याय (ECS, EFT, NEFT, CMP, CMP Fast Plus, Cheque etc.) वापरता येणार नाहीत.

(४) महालेखापाल (ले. व अ.) -१ महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यालयाने केलेल्या सूचनेस अनुसरुन ई-कुबेर व्दारे होणाऱ्या प्रदानांसाठी मुख्य लेखा शिर्ष ८६७० धनादेश व बिले या मुख्य लेखा शीर्षाअंतर्गत १०१ पूर्व लेखापरीक्षा धनादेश आणि १०४ कोषागार धनादेश या दोन्ही गौण शीर्षाअंतर्गत खालील प्रमाणे नविन गट शिर्ष व उप शिर्ष उघडण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **अ) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांच्याकडून केली जाणारी प्रदाने** | | | |
|---|---|---|---|
| जमा | | खर्च | |
| मराठी | इंग्रजी | मराठी | इंग्रजी |
| ८६७०, धनादेश व बिले | 8670, Cheques and Bills | जी-९९<br>८६७०, धनादेश व बिले | G-99<br>8670, Cheques and Bills |
| ०० | 00 | ०० | 00 |
| १०१, पूर्व लेखापरीक्षा धनादेश | 101, Pre Audit Cheques | १०१, पूर्व लेखापरीक्षा धनादेश | 101, Pre Audit Cheques |
| ०० | 00 | ०० | 00 |
| (००)(०२) पूर्व लेखापरीक्षा ई कुबेर प्रदाने (८६७०५०११०१) | (00)(02) Pre Audit e-Kuber Payment (8670501101) | (००)(०२) पूर्व लेखापरीक्षा ई कुबेर प्रदाने (८६७००१३४) | (00)(02) Pre Audit e-Kuber Payment (86700134) |

| ब ) जिल्हा कोषागार कार्यालये आणि उप कोषागार कार्यालये यांच्याकडून केली जाणारी प्रदाने | | | |
|---|---|---|---|
| जमा | | खर्च | |
| मराठी | इंग्रजी | मराठी | इंग्रजी |
| ८६७०, धनादेश व बिले | 8670, Cheques and Bills | जी-९९<br>८६७०, धनादेश व बिले | G-99<br>8670, Cheques and Bills |
| ०० | 00 | ०० | 00 |
| १०४, कोषागार धनादेश | 104, Treasury Cheques | १०४, कोषागार धनादेश | 104, Treasury Cheques |
| ०० | 00 | ०० | 00 |
| (००)(०२) कोषागार ई कुबेर प्रदाने (८६७०५०६५०१) | (00)(02) Treasury e-Kuber Payments (8670506501) | (००)(०२) कोषागार ई कुबेर प्रदाने (८६७००१४३) | (00)(02) Treasury e-Kuber Payments (86700143) |

(५) 'ई-कुबेर' मार्फत प्रदान करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती व सूचना सोबतच्या जोडपत्रामध्ये विषद करण्यात आल्या आहेत. सर्व संबंधितांनी त्या प्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

(६) 'ई-कुबेर' द्वारे शासकीय रकमांचे प्रदान करतांना अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई; सर्व जिल्हा कोषागार कार्यालये आणि सर्व उप कोषागार कार्यालये यांनी 'Standard Operating Procedure (SOP) by RBI for Daily Reconciliation of e-payments by State Government under e-Kuber' याद्वारे विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

(७) 'ई-कुबेर' द्वारे प्रदान या पध्दतीच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई साठी सहायक अधिदान व लेखा अधिकारी / लेखा अधिकारी (संगणक), जिल्हा कोषागार कार्यालयांसाठी अपर कोषागार अधिकारी (धनादेश / संगणक) आणि उप कोषागार कार्यालयासाठी संबंधित उप कोषागार अधिकारी हे समन्वय अधिकारी म्हणून काम करतील.

(८) 'ई-कुबेर' द्वारे प्रदाने करण्यासाठी राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC) यांनी विकसित केलेल्या सुधारित कार्यप्रणालीचे प्रशिक्षण सर्व वापरकर्ते आणि आहरण व संवितरण अधिकारी यांना देणे आवश्यक राहील. प्रशिक्षणाबाबतची कार्यवाही सर्व जिल्हा कोषागार कार्यालयांकरीता संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी व उप कोषागार कार्यालयांकरीता संबंधित उप कोषागार अधिकारी हे पार पाडतील.

(९) 'ई-कुबेर' कार्यप्रणालीच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने भविष्यात तंत्रज्ञानात होणारे बदल विचारात घेऊन प्रचलित प्रणालींमध्ये करावे लागणारे आवश्यक ते विकसन, विहित करावी लागणारी कार्यपध्दती आणि त्यासाठीची प्रशिक्षणे या सर्व बाबींसाठी अनुषंगिक कार्यवाही करण्यासाठी संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

(१०) 'ई-कुबेर' कार्यप्रणालीची अंमलबजावणी करताना काही कार्यात्मक अडचणी उद्भवल्यास त्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य हे वेळोवेळी उचित आदेश निर्गमित करतील. तसेच अपवादात्मक आणि अपरिहार्य परिस्थितीमध्ये तांत्रिक

स्वरुपाच्या कारणांमुळे 'ई-कुबेर' मार्फत प्रदाने करण्यास अडथळा निर्माण झाल्यास, अन्य पर्यायी पध्दतीचा वापर करुन प्रदाने करण्याबाबत संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य हे त्या -त्या वेळी उचित निर्णय घेऊन आदेश निर्गमित करतील. प्रत्येक वित्तीय वर्षअखेरीस दिनांक ३१ मार्च रोजी धनादेशाद्वारे प्रदान करण्याबाबत शासन स्तरावरुन त्या-त्या वेळी समुचित आदेश देण्यात येतील.

(११) 'ई-कुबेर' हे भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे विकसित करण्यात आलेले 'Core Banking Solution' असून सदर प्रणाली राज्याच्या एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीमध्ये (IFMS) राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांचे सहाय्याने आवश्यक ते विकसन करुन घेऊन वापरण्यात येत आहे. सबब, तंत्रज्ञातील संभाव्य बदल आणि कालानुरुप निर्माण होणाऱ्या गरजा विचारात घेता, संबंधित प्रणालीमध्ये आवश्यक ते विकसन राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांचेकडून करवून घेण्यास संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

(१२) सद्यस्थितीत प्रस्तूत शासन निर्णयातील तरतुदी iPLA, VPDAS या प्रणालींसाठी आणि सार्वजनिक बांधकाम विभाग, वन विभाग आणि जलसंपदा विभाग यांच्याद्वारे BEAMS प्रणालीच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या प्रदानांसाठी लागू राहणार नाहीत.

(१३) 'ई-कुबेर' मार्फत प्रदाने करण्याची कार्यपध्दती अंमलात आणण्यापूर्वीच्या कालावधीतील अभिकर्ता बँकांच्या संदर्भातील मुख्य लेखाशीर्ष ८६७५ भारतीय रिर्झव्ह बँकेकडील ठेवी (Deposits with Reserve Bank) च्या अनुषंगाने विद्यमान प्रलंबित तफावती (Existing Outstanding Discrepancies) दूर झाल्या आहेत, हे सूनिश्चित करण्याची सूचना महालेखापाल (ले.व अ.) -१ महाराष्ट्र, मुंबई यांनी केली आहे. तसेच प्रचलित CMP, NEFT, इत्यादी कार्यपध्दती अंतर्गत व्यवहारांच्या संदर्भातील गत कालावधीशी संबंधित समायोजनांमुळे (Prior Period Adjustment) गत कालावधीशी संबंधित तफावती नव्याने निर्दशनास येणार नाहीत, हे सुनिश्चित करण्याची देखील सूचना महालेखापाल (ले.व अ.) -१ महाराष्ट्र, मुंबई यांनी केली आहे. महालेखापाल (ले.व अ.) -१ महाराष्ट्र, मुंबई यांच्या प्रस्तुत सूचनांस अनुसरून नियमोचित अनुपालनात्मक कार्यवाही सर्व संबंधितांकडून केली जाईल हे संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे सुनिश्चित करतील.

(१४) शासकीय प्रदानांसाठी 'ई-कुबेर' च्या वापराच्या अनुषंगाने महाराष्ट्र कोषगार नियम, १९६८ मधील व 'जिल्हा कोषागारांच्या मार्गदर्शनासाठी धनादेशाद्वारे प्रदानांच्या कार्यपध्दतीच्या नियमावलीतील' आणि 'अधिदान व लेखा कार्यालय नियमावलीतील' संबंधित नियमामंमध्ये यथावकाश सुधारणा करण्यात येतील.

प्रस्तुत शासन निर्णय महालेखापाल (ले.व अ.)- १ महाराष्ट्र, मुंबई यांनी त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक. सं.ख.वि/चा-१/वित्त विभाग/यूओआर-०१/२०२४-२५/२४० दि. २२.०५.२०२४ आणि अनौपचारिक संदर्भ क्र.सं.ख.वि/चा-१/वित्त विभाग/यूओआर-४९/२०२४-२५/३६२ दिनांक २४.०६.२०२४ तसेच वित्त विभाग / अर्थ २ कार्यासन, यांनी त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. अ.नौ.सं.क्र. ८५/अर्थ-०२ दिनांक २३ जुलै २०२४ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०८१६१२४५२५६३०५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR

Digitally signed by DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=b8e8c3a034acb70f16af6f81c69ca038ff6f25ff78cfc9e6d815fd95b5367b07, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=37A42E182BACE4C129ABBEB54E27836D32D401560638F644A547867205474EE5, cn=DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
Date: 2024.08.16 13:07:44 +05'30'

**( डॉ.राजेंद्र गाडेकर )**
**शासनाचे उप सचिव,**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव,
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव,
५. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
८. अ.मु.स./प्र.स./सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख, व कार्यालय प्रमुख.
१०. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
११. महालेखापाल (लेखा परीक्षा) १, महाराष्ट्र, मुंबई,
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१३.महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१५.आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१६.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन*, नागपूर ४४४००१
१७.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१८.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

१९.सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
२०.प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२१.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
२२. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२३. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
२४.सर्व विभागीय आयुक्त,
२५.सर्व जिल्हाधिकारी,
२६.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२७.संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२८.अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, वांन्द्रे (पूर्व)/फोर्ट, मुंबई,
२९.प्रादेशिक सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर.
३०.संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई,
३१.प्रादेशिक सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कोकण / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर.
३२.वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजी नगर / अमरावती / नागपूर
३३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३४. सर्व उप कोषागार अधिकारी.
३५.वित्त विभागातील सर्व कार्यासने.
३६.निवड नस्ती कोषा. प्रशा.-५.

**शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.२०/२०२४/कोषा-प्रशा-५, दि.१६ ऑगस्ट,२०२४ सोबतचे जोडपत्र भारतीय रिझर्व्ह बँकेच्या 'ई-कुबेर' (e-Kuber) मार्फत प्रदाने करण्याची कार्यपध्दती.**

१. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई ; जिल्हा कोषागार कार्यालय आणि उप कोषागार कार्यालय यांचे स्तरावर 'ट्रेझरीनेट' प्रणालीमध्ये 'ई-कुबेर' विषयक कामकाज पार पाडत असताना C-DAC, पुणे यांनी विकसित केलेल्या 'ई-हस्ताक्षर' (e-Hastakshar) सुविधेचा वापर करणे अनिवार्य राहिल. त्यासाठी संबधित वापरकर्त्यांचे स्वयंघोषणापत्र (Self Declaration) संबंधित प्रणालीवर नोंदविले जाणे अनिवार्य राहील.

२. 'ई-कुबेर' च्या माध्यमातून प्रदान करण्याच्या अनुषंगाने आहरण व संवितरण अधिकारी यांनी अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीमध्ये (BEAMS मध्ये) 'Add Payee' या मेनूमध्ये 'नोंदणीकृत अदाता' (Registerted Payee) नोंदविण्याची कार्यवाही करावी. अदात्याचे नाव आणि बँक खाते क्रमांकासह इतर सर्व तपशिलाची अचूक नोंद होईल, याची दक्षता संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावी.

३. अदाता नोंदणीसाठी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून रद्द धनादेशासहित प्राप्त झालेल्या आवेदनातील तपशील तपासून यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई किंवा जिल्हा कोषागार कार्यालय किंवा उप कोषागार कार्यालय यांच्या स्तरावर प्रणालीमध्ये नोंदणीकृत अदात्यास मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

४. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई किंवा जिल्हा कोषागार कार्यालय किंवा उप कोषागार कार्यालय यांनी मान्यता दिलेल्या प्रकरणांचे 'अदाता नोंदणी प्रमाणपत्र' (Payee Registration Certificate) अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीमध्ये (BEAMS मध्ये) 'Reports' या मेनूमध्ये 'Registered Payee' या पर्यायांतर्गत संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना उपलब्ध होईल.

५. संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई किंवा जिल्हा कोषागार कार्यालय किंवा उप कोषागार कार्यालय येथील देयक स्वीकृती खिडकीवर सादर करण्यात आलेली देयके, 'स्क्रोल ऑपरेटर' यांनी प्रचलित कार्यपध्दतीनुसार 'ट्रेझरीनेट' प्रणालीतील Bar Code-Scroll Entry या मेनूचा वापर करुन स्वीकारावीत.

६. देयक स्वीकृत खिडकीवर स्वीकृत केलेली देयके प्रचलित कार्यपध्दतीनुसार संबधित लेखापरीक्षण शाखांमध्ये पाठविण्यात यावीत. लेखापरीक्षण शाखेत पारित झालेल्या देयकांकरीता 'ई-कुबेर' हा पर्याय स्वाभाविकत: (By Default) उपलब्ध असेल.

७. लेखापरीक्षण शाखेने पारित केलेली देयके पर्यवेक्षक, धनादेश शाखा (Cheque Supervisor)यांना त्यांच्या प्रणालीतील Login मध्ये प्रदानाची पडताळणी (Verification) करण्यासाठी प्रणालीमध्ये तसेच प्रत्यक्षात भौतिक स्वरुपात देखील उपलब्ध होतील. पर्यवेक्षक, धनादेश शाखा हे अशा सर्व

देयकांची पडताळणी करतील. उप कोषागार कार्यालयाच्या संदर्भात सदर कार्यवाही उप कोषागार अधिकारी यांचे द्वारे करण्यात येईल.

८. पर्यवेक्षक, धनादेश शाखा यांनी पडताळणी केलेली देयके सहाय्यक अधिदान व लेखा अधिकारी / अप्पर कोषागार अधिकारी, धनादेश शाखा यांना त्यांच्या प्रणालीतील Login मध्ये यांच्या लॉगीन मध्ये तसेच प्रत्यक्षात भौतिक स्वरुपात देखील उपलब्ध होतील.

९. सहाय्यक अधिदान व लेखा अधिकारी / अप्पर कोषागार अधिकारी, धनादेश शाखा तसेच उप कोषागार कार्यालयाच्या संदर्भात उप कोषागार अधिकारी यांचेकडून प्रदान संमत झालेल्या देयकांचा प्रदान विषयक तपशील (जसे बँकेचे नाव, खाते क्रमांक, रक्कम, IFSC इत्यादी) संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना त्याची अचूकता तपासून अंतिमीकरणासाठी ‘अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीमध्ये’ (BEAMS मध्ये) DDO Login मध्ये Maintenance या मेनूमध्ये Approve e-kuber bill या पर्यायाखाली उपलब्ध होईल.

१०. सर्व तपशिल योग्य असल्यास आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित प्रदानाला मंजूरी दयावी. याकरीता आहरण व संवितरण अधिकारी यांना कमाल १० दिवसांची मुदत उपलब्ध असेल.

११. प्रदानाच्या अनुषंगाने सर्व बाबींची (उदा. बँकेचे नाव, खाते क्रमांक, रक्कम, IFSC इत्यादी) तपासणी करुन आहरण व संवितरण अधिकारी यांनी अंतिम मान्यता दिलेले प्रदान तपशिल सहायक अधिदान व लेखा अधिकारी अथवा अप्पर कोषागार अधिकारी, धनादेश शाखा तसेच उप कोषागार कार्यालयाच्या संदर्भात संबंधित उप कोषागार अधिकारी यांना प्रदानासाठी प्रणालीमध्ये प्राप्त होईल. तद्नंतर सहाय्यक अधिदान व लेखा अधिकारी अथवा अप्पर कोषागार अधिकारी, धनादेश शाखा तसेच उप कोषागार कार्यालयाच्या संदर्भात संबंधित उप कोषागार अधिकारी यांनी या प्रदानास मान्यता दिल्यानंतर अशा देयकांना ट्रेझरीनेट प्रणालीमार्फत प्रमाणक क्रमांक व प्रमाणक दिनांक तसेच 'ॲडव्हाइस क्रमांक' व 'ॲडव्हाइस दिनांक' प्राप्त होईल.

१२. ‘ई-हस्ताक्षर’ सुविधेचा अवलंब करुन सहाय्यक अधिदान व लेखा अधिकारी / अप्पर कोषागार अधिकारी, धनादेश शाखा तसेच उप कोषागार कार्यालयाच्या संदर्भात संबंधित उप कोषागार अधिकारी हे अशा प्रदानांसाठी ‘Zip File’ तयार करतील. सदर ‘Zip File’ ट्रेझरीनेट प्रणालीच्या माध्यमातून भारतीय रिझर्व्ह बँकेच्या 'SFTP Server' मार्फत ‘ई-कुबेर’ प्रदान प्रणालीवर पाठविली जाईल.

१३. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ‘ई-कुबेर’ प्रणालीवर पाठविण्यात येणारी ‘Zip File’, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सर्व्हरवर अपलोड झाल्याबाबत ट्रेझरीनेट प्रणालीवर 'Ack Note', 'Debit Note' आणि 'Account Statement' प्राप्त होईल.

१४. ट्रेझरीनेट प्रणाली मधून झालेल्या प्रदानाचा ताळमेळ घेण्याकरिता ‘ई-कुबेर’ प्रणालीव्दारे प्राप्त झालेल्या ‘Ack Note' व 'Debit Note’ फाईल्स धनादेश मेळ/ धनादेश शाखेकडून दररोज

ट्रेझरीनेट प्रणाली वरून डाऊनलोड करून ट्रेझरीनेट प्रणालीमध्ये अपलोड करण्याची कार्यवाही करावी. उप कोषागार कार्यालयाच्या संदर्भात सदर कार्यवाही उप कोषागार अधिकारी यांचे द्वारे करण्यात येईल.

१५.अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालय / उप कोषगार कार्यालय यांचेकडून प्रदानांसाठी पाठविण्यात आलेली 'Zip File' भारतीय रिझर्व बँक यांचेकडून काही तांत्रिक कारणांमुळे (उदा. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सर्व्हरमध्ये काही तांत्रिक बिघाड, नेटवर्क वाहिनीमधील तांत्रिक बिघाड इ.) परत केली जाऊ शकते. अशा 'Zip File' ट्रेझरीनेट प्रणालीमध्ये 'Negative Acknowledgement Files', म्हणून उपलब्ध असतील.

१६.भारतीय रिझर्व्ह बँकेकडून काही तांत्रिक कारणांमुळे रद्द झालेल्या 'Negative Acknowledgement' च्या 'Zip File' मधील प्रदानांबाबत संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून दुबार देयक स्विकारून पुन्हा प्रदानाची कार्यवाही अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालय / उप कोषगार कार्यालय यांना करता येईल.

१७.अदात्यांच्या बँक खात्यातील बदलामुळे काही प्रदाने शासनाच्या बँक खाती खर्ची पडल्यानंतर परत येण्याची शक्यता आहे. (उदा. बँक खाते क्रमांक चुकीचा असणे, 'IFSC' चुकीचा असणे. अदात्याच्या नावांत बदल इ.) अशी प्रदाने ट्रेझरीनेट प्रणालीवर 'e-kuber return notification' या पर्यायामधून 'डाऊनलोड' करुन ट्रेझरीनेट प्रणालीवर अशी प्रदाने 'अपलोड' करावीत. परत आलेल्या व्यवहारांचे लेखांकन प्रचलित पध्दतीनुसार मुख्य लेखाशिर्ष ८६७० अंतर्गत करावे.

१८.अशा प्रकरणी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून दुरूस्त स्वरूपात दुबार देयक स्विकारून प्रदानाची कार्यवाही अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालय / उप कोषगार कार्यालय यांना करता येईल.

१९.'ई-कुबेर' प्रदान पद्धतीमधील अपयशी प्रदानांबाबत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून दुरुस्त स्वरूपातील दुबार देयक ७ दिवसांच्या कालावधीमध्ये अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई तसेच जिल्हा कोषागार कार्यालय /उप कोषागार कार्यालय येथे सादर न झाल्यास, त्यानंतर संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्याच्या पुढील देयकांची स्वीकृती ट्रेझरीनेट प्रणालीमध्ये बंद करण्यात येईल.

२०.'ई-कुबेर' मार्फत होणाऱ्या सर्व प्रदानांचा ताळमेळ प्रचलित कार्यपध्दतीनुसार घेण्याची जबाबदारी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथील धनादेश मेळ शाखा / जिल्हा कोषागार कार्यालयातील धनादेश शाखेची आणि संकलन शाखेची राहील. उप कोषागार कार्यालयाच्या संदर्भात सदर जबाबदारी संबंधित उप कोषागार अधिकारी यांची राहिल.

२१.अपयशी झालेल्या प्रदानांच्या संदर्भात संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्याकडून दुबार देयक प्राप्त न झाल्यास, अशी प्रदाने महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम १७० नुसार, ९० दिवसांपर्यंत वैध राहतील व त्यानंतर प्रचलित कार्यपध्दतीनुसार व्यपगत होतील. त्यास जिल्हा

कोषागार कार्यालयामार्फत महालेखापाल (ले. व अ.) कार्यालयाची मान्यता घ्यावी. तद्नंतर व्यपगत धनादेशाची कार्यपध्दती वापरुन आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना देयक पुन्हा जिल्हा कोषागार कार्यालयात / उप कोषागार कार्यालयात सादर करण्यास कळवावे. अधिदान व लेखा कार्यालयाच्या बाबतीत अशा प्रदानाबाबत व्यपगत धनादेशाची प्रचलित कार्यपध्दती अनुसरावी.

२२. भारतीय रिझर्व्ह बँकेकडून अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई तसेच जिल्हा कोषागार कार्यालय / उप कोषागार कार्यालय यांना DMS Report (Date wise Monthly Statement) उपलब्ध करून दिला जाईल.

२३. भारतीय रिझर्व्ह बँकेकडून प्राप्त DMS report (Date wise Monthly Statement) ची पडताळणी संबंधित अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई तसेच जिल्हा कोषागार कार्यालय / उप कोषागार कार्यालय यांनी करून VDMS Report (Verified Date wise Monthly Statement) स्वाक्षरी करून भारतीय रिझर्व्ह बँक आणि महालेखापाल (ले. व अ.) कार्यालय यांना दरमहा सादर करावा.

२४. 'ई-कुबेर' व्दारे प्रदान पद्धतीद्वारे प्रदान करण्यासाठी तयार केलेली इलेक्ट्रॉनिक Payment File (Mandate File) चुकीने दुसऱ्या कोणत्याही प्रदान पद्धतीसाठी वापरण्यात येणार नाही याची अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई तसेच जिल्हा कोषागार कार्यालय / उप कोषागार कार्यालय यांनी काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

२५. भारतीय रिझर्व्ह बँकेकडून अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई तसेच जिल्हा कोषागार कार्यालय / उपकोषागार कार्यालय यांना PSB1, PSB2 आणि PSB4 या नमुन्यातील अहवाल दरमहा उपलब्ध करुन देण्यात येतील.

अ) PSB1 - Account Head Wise Statement (Groupwise) हा एकत्रित गोषवारा स्वरूपाचा मासिक अहवाल,

ब) PSB2 - Account Head wise Statement (Account wise) हा प्रत्येक अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई/ प्रत्येक जिल्हा कोषागार कार्यालय / उप कोषागार कार्यालय निहाय भारतीय रिझर्व्ह बँक बेलापूर / नागपूर शाखा येथे उघडण्यात आलेल्या बँक खातेनिहाय दैनंदिन व्यवहारांचा तपशील नमूद करणारा मासिक अहवाल.

क) PSB4 - Account Head Wise Statement (For RBI Region) हा भारतीय रिझर्व्ह बँकेच्या बेलापूर शाखा region आणि नागपूर शाखा region या अंतर्गत संबंधित अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई तसेच जिल्हा कोषागार कार्यालय / उप कोषागार कार्यालय यांच्या प्रत्येक महिन्यातील व्यवहार दिनांकाच्या तपशिलाचा मासिक अहवाल.

२६. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालय / उप कोषागार कार्यालय यांनी उक्त परिच्छेद क्रमांक (२५) मधील (अ) (ब) आणि (क) समोर नमूद तीनही अहवालांची पडताळणी काळजीपूर्वक करण्याची कार्यवाही दरमहा करावी. अशा पडताळणी दरम्यान काही तफावत

आढळल्यास भारतीय रिझर्व्ह बँक, बेलापूर / नागपूर शाखा यांना त्वरित ई-मेलद्वारे अवगत करावे आणि तफावतीचे सत्वर निराकरण करून घ्यावे.

२७. 'ई-कुबेर' व्दारे प्रदान करताना काही तांत्रिक स्वरुपाच्या अडचण उद्भवल्यास, 'ACK File', 'DN File', 'AS File' आणि अपयशी प्रदानांच्या बाबतीत RN file भारतीय रिझर्व्ह बँकेकडून प्राप्त न झाल्यास, अशा प्रकरणांच्या संपूर्ण तपशिलासह इंग्रजी भाषेतील सविस्तर ई-मेल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या Support Team च्या ekuberqpxsupport@rbi.org.in या ई-मेल पत्तावर पाठविण्यात यावा.